ज.भ.शि.प्र.मंडळाचे,

# कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

## शिवाजीनगर, गढी.

### बी.ए.तृतीय वर्षे - पेपर - IX

### विषय :- भारतीय साहित्यविचार

प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक)

मराठी विभाग

## साहित्य म्हणजे काय ?

‘साहित्य’ हा शब्द लॅटिन शब्दापासून तयार झाला असला तरी ‘लिटरेचर’ या इंग्रजी शब्दाला मराठीमध्ये ‘साहित्य’ वा ‘वाङ्मय’ असा शब्द वापरतात. साहित्य म्हणजे अक्षरांनी तयार केलेले लेखन आहे. साहित्य हे सामान्यत: सर्जनशील कल्पनेच्या कामांना संदर्भित करते. किंवा लिखित आणि कधीकधी बोलल्या जाणा-या सामग्रीचे वर्णन करण्यासाठी वापरला जातो. कथा, कविता, कादंबरी,नाटक या शब्दरुप कलाकृतींना आपण साहित्य म्हणतो.

साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबध असल्यामुळे साहित्य हा समाजाचा आरसा असतो. समाजात घडणा-या घटनांचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. त्यामुळे साहित्य अनादीकाळापासून चालत आले आहे.




व्याख्या :-1. भामह- शब्दार्थो संहितां कायम्

2. वामन :- रीती:आत्मा काव्यस्

3.आनंदवर्धन - काव्यारसात्मा ध्वनि

4. रुद्रट - ननु शब्दार्थो काव्यं

प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

## साहित्य प्रयोजन

लेखक साहित्य निर्मिती का करतो ? वाचक साहित्य का वाचतो ? अशा दुहेरी स्वरुपाचा विचार साहित्य प्रयोजनामध्ये केला जातो. आजपर्यंत साहित्याच्या अभ्यासकांनी प्रयोजनाचा विचार साहित्यकारांच्या बाजूनेच मांडला आहे. मम्मट या अभ्यासकांनी सांगितलेली प्रयोजने खालील प्रमाणे.

मम्मट - काव्यंयशसे अर्थकृते , व्यवहारविदे , शिवतरक्षतये
साद्य: परनिर्वृत्तये , कान्तासंमितयोपदेशयुजे

असे मम्मट या भारतीय अभ्यासकांनी सहा प्रयोजने सांगितली आहेत.

साहित्य प्रयोजने




प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

# साहित्य निर्मिती प्रक्रिया

साहित्य निर्मिती प्रक्रिया ही फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. ‘ आपण काही तरी तरावया गावे’ ही साहित्य निर्मिती मागची प्राचीन प्रेरणा घेऊन आपले अनुभव इतरांना सांगावे या उद्देशाने साहित्य निर्मिती केली जाते. अनुभव, वाचन, श्रवण आणि अभ्यासातून साहित्य निर्मिती होत असते. त्यामुळे साहित्यातून संस्कृतीचे दर्शन घडते.




प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

# रसविचार

साहित्य विचारात रसाचे स्थान अत्यंत महत्वाचे मानले जाते. रससिध्दांत भरतमुनींनी आपल्या नाटयशास्त्रात सर्व प्रथम मांडला. विश्वनाथाने तर रसात्मकं वाक्य काव्यं अशी व्याख्याच केली. रस म्हणजे आस्वाद. आस्वादानुकूल संवेदना म्हणजे रस. ही संवेदना निर्माण करण्याचे सामर्थ्य काव्यात आहे. रस म्हणजे केवळ भावना जागृती नव्हे तर भावना जागृत करण्यास समर्थ असलेली चितवृत्ती होय.



## शब्दशक्ती व अर्थविचार

शब्द हे साहित्याचे शस्त्र आहे. शब्दांना साहित्यात अनन्यसाधारण महत्व आहे. शब्दांना साहित्याचा आत्मा ही म्हटले जाते. शब्दशक्तीमुळे साहित्याला सौंदर्य प्राप्त होते. भारतीय अभ्यासकांनी शब्दांच्या तीन शक्ती मानल्या आहेत

### शब्दशक्तीचे तीन प्रकार



# धन्यवाद...

**प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक)** मराठी विभाग